## <u>प्रेस नोट</u>

अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.१३.०१.२०२२

**आलोसे श्री.वसंत पंडीत बारी, वय–५३, व्यवसाय–नोंकरी,कनिष्ठ लिपीक, पंचायत समिती कार्यालय,जामनेर रा.शेंदुर्णी ता. जामनेर जि.जळगांव यांना ३,०००/–रु.लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वीकारंताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगांव यांची कारवाई.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | जामनेर पो.स्टे. गु.र.नं. २७/२०२२ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | श्री.वसंत पंडीत बारी, वय–५३, व्यवसाय–नोंकरी, कनिष्ठ लिपीक,पंचायत समिती कार्यालय, जामनेर रा.शेंदुर्णी ता.जामनेर जि.जळगांव<br>**(जिल्हा परिषद विभाग, वर्ग–३)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.११/०१/२०२२<br>३,०००/–रु. लाचेची मागणी करुन स्वीकारले. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | ३,०००/–रु. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१३/०१/२०२२ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील तक्रारदार यांचे नावे चिंचोली पिंप्री शिवारात शेतगट नं.१३२/१, क्षेत्र ०.८२आर दोन असे एकुण ०२ एकर शेती आहे. तक्रारदार यांनी दि.१४/०७/२०२१ रोजी सदर शेतात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मिळणाऱ्या गुरांचा गोठा (शेडबांधणी) १५X३० या आकाराचा यासाठी अनुदार मिळणेसाठी स्वत:चे नावे विहीत नमुन्यात कागदपत्रांसह अर्ज भरुन ग्रामपंचायत मार्फतीने पंचायत समिती जामनेर यांचे कार्यालयात सादर केला होता. तक्रारदार यांनी दि.१०/०१/२०२२ रोजी पंचायत समिती कार्यालय,जामनेर येथे जावुन संबंधीत लिपीक वसंत बारी यांची भेट घेवुन गोठा अनुदानाविषयी त्यांचेशी बोलणी केली. तेव्हा लिपीक वसंत बारी यांनी तक्रारदार यांना तुमचे अनुदान मंजुर झाले आहे. परंतु तुम्हाला तुमच्या गोठा अनुदानासाठी वर्क ऑर्डर गटविकार अधिकारी मॅडम यांच्या सही शिवाय मिळणार नाही. त्यासाठी तुम्हाला गटविकास अधिकारी मॅडम यांना ५०००/–रु.द्यावे लागतील असे सांगुन ५०००/–रु.लाचेची मागणी करीत असले बाबत तक्रारदार यांनी दि.११/०१/२०२२ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाकडे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारासमक्ष दि.११.०१.२०२२ रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी तक्रारदार यांचेकडे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेल्या गुरांचा गोठा अनुदानाची वर्क ऑर्डर देण्याचे मोबदल्यात गटविकास अधिकारी मॅडम यांचे नावाने पंचासमक्ष ३,०००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि.१३/०१/२०२२ रोजी पंच साक्षीदारासमक्ष तक्रारदार यांचेकडुन स्वत: वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री क्रमांक:–** १०६४

**दुरध्वनी क्रमांक:–** ०२५७–२२३५४७७

**व्हॉटस्ॲप क्रमांक:–** ८७६६४१२५२९

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

13.1.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**